आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

31 ऑगस्ट २०२६ -सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहयोगी प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाची मंजुरी

- आय एन एस निपुण नौदलाच्या ताफ्यात समारंभपूर्वक दाखल

- नेपाळमध्ये ९०३ पूरबळींचे मृतदेह सापडले / ४ हजारांपेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता

**आणि**

- नोवाक जोकोविच अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत बाद

**<><><><><>**

राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहयोगी प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाने मंजुरी दिली आहे, तसंच भरतीच्या वेळी मुलाखतीचं सीसीटीव्ही चित्रीकरण अनिवार्य करण्यात आलं आहे.उच्च आणि तंत्रशिक्षण विभागने आज त्याची अधिसूचना जारी केली. विद्यार्थी पटसंख्या आणि कार्यभार यासंबंधी ऑक्टोबर २०२५मधे तयार केलेल्या समीकरणानुसार ही पदं मंजूर केली आहेत. संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठ आयोगाच्या नियमांनुसार पदभरतीची प्रक्रीया करावी असं अधिसूचनेत म्हटलं आहे. मुलाखतीचं चित्रीकरण मुलाखतीच्या दिवसापासून एक वर्षासाठी सांभाळून ठेवावं असंही शासनाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

देशात चिप उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं सेमीकॉन योजनेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. यासाठी १ लाख २७ हजार कोटी रुपयांची

तरतूद करण्यात आली आहे. भारतीय कंपन्यांनी या चिप्सची रचना करणं, त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांसाठी उत्पादन केंद्रं उभारणं, सेमींकडक्टर फॅब्स, चिप्सची जोडणी, पॅकेजिंग आणि चाचण्या अशा सहा भागांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. सेमीकंडक्टर उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीला आर्थिक पाठबळ देण्यात येईल, असं सरकारनं याबद्दलच्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात एसआयआर अर्थात मतदार याद्यांची फेरतपासणी आणि सुधारणा मोहिमेअंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत आपलं नाव समाविष्ट असल्याची खात्री करून घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. ही प्रारूप मतदार यादी जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. त्याचबरोबर राजकीय पक्षांची कार्यालयं, तहसील कार्यालयं आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्येही नागरिकांना ही यादी पाहता येणार आहे.

सातारा जिल्ह्यातल्या आठही विधानसभा मतदारसंघातली प्रारूप मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत आज प्रसिद्ध करण्यात आली. जिल्ह्यात २६ लाख ५१ हजार ३४७ मतदारांपैकी ३ लाख ४१ हजार ९२५ मतदारांचं गणना प्रपत्र आयोगाला मिळालेलं नाही. १ लाख ९१ हजार मतदार कासमसाठी स्थलांतरित झाले आहेत, तर ८८ हजार ४९० मतदार हयात नसल्याची नोंद झाली आहे.

**<><><><><>**

आय एन एस निपुण हे जहाज आज भारतीय नौदलाच्या ताफ्यात समारंभपूर्वक दाखल झालं. निस्तार वर्गाच्या डी एस व्ही श्रेणीतल्या या  जहाजाची बांधणी   विशाखापट्टणम इथल्या हिंदुस्थान शिपयार्ड लिमिटेडनं स्वदेशी तंत्रज्ञानानं केली आहे. या जहाजामुळे खोल समुद्रातल्या परिचालनासाठी भारतीय नौदलाला नवी शक्ती मिळाली आहे, असं नौदलप्रमुख ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांनी मुंबईत या समारंभात बोलताना सांगितलं.  सध्या सागरी क्षेत्र अधिकाधिक स्पर्धात्मक आणि आव्हानात्मक होत आहे, त्यामुळे  धोरणात्मक परिवर्तन ही काळाची गरज बनल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

समुद्राच्या वेगवान लाटा आणि प्रतिकूल हवामानातही स्थिर राहून काम करण्याची क्षमता आय एन एस निपुण या जहाजाकडे आहे. त्यामुळे समुद्राच्या तळाशी अडकलेल्या पाणबुडीसह खलाशांना बाहेर काढणं किंवा समुद्राखाली बिघडलेली जहाजं अथवा त्यावरची यंत्रसामुग्री दुरुस्त करणं आता शक्य होऊ शकेल.

**<><><><><>**

वस्त्र आणि वस्त्रप्रावरण क्षेत्र हा केवळ देशाच्या सांस्कृतिक वारशाचाच महत्त्वाचा भाग नाही तर त्याचं  लाखो नागरिकांना उपजीविका देण्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. त्या नवी दिल्लीत राष्ट्रीय फॅशन टेक्नॉलॉजी संस्थेच्या पदवीदान समारंभात बोलत  होत्या. देशाचा उच्च सांस्कृतिक वारसा आणि मूल्य  यांच्या आधारे जागतिक दृष्टिकोन अंगिकारण्याचं आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केलं. सध्या या क्षेत्रात महिलांचं प्राबल्य असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**होल्ड बाईट राष्ट्रपती**

देशभर पसरलेल्या फॅशन टेक्नॉलॉजी संस्थेच्या १८ संकुलांमधल्या विद्यार्थ्यांना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

नेपाळमध्ये आलेल्या पुरानंतर मदत, बचाव आणि शोधकार्य आजही सुरू आहे. आतापर्यंत ९०३ जणांचे मृतदेह सापडले असून ४ हजारांपेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळचं पोलीस दल, लष्कर तसंच सरकारी कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. नेपाळमधल्या रुग्णालयांमध्ये मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या कामासाठी डीएनए विश्लेषणात तज्ज्ञ असलेल्या भारताचं १८ सदस्यीय न्यायवैद्यक तज्ज्ञांचं पथक नेपाळमध्ये दाखल झालं आहे. ज्या मृतदेहांची ओळख पटवणं शक्य नसेल, त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याची माहिती नेपाळचे परराष्ट्र सचिव अमृत बहादूर राय यांनी दिली आहे. इथल्या चिलिमे आणि लांगटांग परिसरातल्या जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमध्ये शेकडो जण अडकले असून त्यांना बाहेर काढण्यासाठी भारत आणि नेपाळच्या पथकांकडून शोध आणि बचावकार्य सुरू आहे.

पूरबाधित जिल्ह्यांमधून आतापर्यंत एकूण १० हजारांपेक्षा जास्त लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं असून ३ हजारांपेक्षा जास्त नेपाळी नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. दरम्यान, ४०३ भारतीय नागरिक चीनमधून सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले असून, ५०० भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडे आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या ४०४ नागरिकांची नोंद झाली आहे.

**<><><><><>**

नीट पेपरफुटीसंदर्भात झालेल्या आंदोलनादरम्यान आंदोलक विद्यार्थ्यांविरोधात दाखल झालेले एफआयआर रद्द करण्यासाठी केंद्रसरकारने

सर्वोच्च न्यायालयात अर्ज केला आहे. संविधानाच्या १४२व्या कलमान्वये मिळालेल्या विशेषाधिकारांचा वापर करण्याची परवानगी महाअधिवक्ता तुषार महेता यांनी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालच्या पीठाकडे मागितली. न्यायालय उद्या या अर्जावर सुनावणी करेल.

<><><><><>

पेट्रोल पंपांवर इंधन भरण्यासाठीच्या प्रत्येक नळीच्या तोंडावर पेट्रोलमधल्या इथेनॉलचं नेमकं प्रमाण दर्शवणारं माहितीचं लेबल लावण्याचे निर्देश केंद्र सरकारला द्यावेत अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळली. सध्याच्या वाहनांच्या ताफ्यासाठी ई ट्वेंटीच्या प्रत्यक्ष वापराबाबतच्या सुसंगततेची तपासणी करण्यासाठी आणि त्यासंदर्भात सार्वजनिक अहवाल सादर करण्यासाठी एका स्वतंत्र तज्ज्ञ समितीची स्थापना करावी अशा मागण्या याचिकेत करण्यात आल्या होत्या. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर आज सुनावणी झाली. संबंधिक याचिका ही दुसऱ्याच्या वतीने किंवा अप्रत्यक्ष हेतूने केलेली याचिका असून अशाच प्रकारची याचिका यापूर्वी न्यायालयाने फेटाळल्याचा युक्तिवाद महाधिवक्ता आर. वेंकटरमणी यांनी केला. तो मान्य करून संबंधित याचिका उच्च न्यायालयापुढे सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले.

<><><><><>

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या सदस्यांच्या कार्यकाळाबद्दलची सुनावणी तातडीनं घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं मान्यता दिली आहे. १५ सप्टेंबरला होणारी सुनावणी आता ८ सप्टेंबरपूर्वी होईल. न्यायालयानं या सदस्यांना दिलेली मुदतवाढ ८ तारखेला संपत असून त्यानंतर प्राधिकरणाची तीनही पीठं कार्यरत राहणार नाहीत, असं बार असोसिएशननं लक्षात आणून दिल्यानंतर सुनावणी लवकर घ्यायचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं घेतला.

<><><><>

सर्बियाचा अग्रगण्य टेनिसपटू नोवाक जोकोविच अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत बाद झाला. न्यूयॉर्कच्या आर्थर ॲश मैदानावर काल अर्जेंटीनाच्या मारियानो नोवोन ने अटीतटीच्या सामन्यात त्याचा पराभव केला. विविध दुखण्यांनी बेजार झालेल्या जोकोविचने ही लढत ७-६ , ५-७, ४-६, ६-२, ६-१ अशी गमावली.

<><><><>

महिला क्रिकेटमधे दुबईत सुरू असलेल्या आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेत भारताने काल थायलंड संघाचा ९४ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली. भारताने विजयासाठी १६० धावांचं आव्हान दिलं होतं मात्र थायलंडचा डाव सतराव्या षटकांत ६५ धावांत आटोपला. ६४ धावा फटकावणारी शफाली वर्मा सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. भारताचा यानंतरचा सामना येत्या गुरुवारी ३ सप्टेंबर रोजी हाँगकाँग विरुद्ध होणार आहे.

<><><><>

नागपूरमधल्या भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेनं आज महाल इथल्या श्री क्षेत्र कल्याणेश्वर मंदिरात कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित केलं होतं. या प्रसंगी २०० हून अधिक महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

//<><><><>//